
# प्रकाश प्रवहन

भाग ३ अंक ३ | द्वै–मासिक पत्रिका | मे–जून २०२५



## गुरुजी कृष्णानंद (१९३९–२०१२)

### प्रकाश

प्रकाश, हा भौतिक प्रकाश नसून सूक्ष्म पातळीवरचा प्रकाश आहे, जो सर्व निर्मितीचा स्त्रोत आहे. प्रेम, शांती, सत्य, बुद्धी आणि सर्व जीवनाचा तो स्त्रोत आहे. हा प्रकाश म्हणजेच देव.

### प्रवहन

म्हणजे प्रकाशाला हेतूपुर्वक आपल्या शरीरात येण्याची अनुमती देऊन त्यानंतर पूर्ण जगात त्याला पसरविणे. आपले शरीर प्रकाशाला स्थूल पातळीत बदलते. ही प्रकाशाची कंपनं, सर्व प्राणिमात्र आणि निसर्गात पोहोचतात. त्यात प्रेम, शांती, सकारात्मकता आणि हीलिंग अशा वेगवेगळ्या शक्ती असतात, त्या परिवर्तनासाठी मदत करतात. माणसं अजून चांगली होतील आणि हे जग, एक अजून चांगली जागा असेल.

### तंत्र

तुमच्यावर प्रकाशाचा महासागर आहे अशी कल्पना करा. आता हा प्रकाश खाली येऊन तुमच्या पूर्ण शरीरात भरतो आहे अशी कल्पना करा. आता प्रेम, प्रकाश आणि शांती ह्याचा एक मिनीटभर अनुभव घ्या. आता कल्पना करा की हा प्रकाश हळूहळू तुमच्या शाळेत, परिसरात, राज्यात, देशात आणि मग संपूर्ण जगात पसरतो आहे.

ह्याचा कमीतकमी ७ मिनीटे सराव करा.

### प्रकाश प्रवहन जागतिक चळवळ

गुरुजी कृष्णानंद, संस्थापक सप्तर्षी मार्ग, ह्यांनी १८ मे २००८ रोजी ह्या चळवळीची सुरुवात केली. ही चळवळ म्हणजे, रोज कमीतकमी ७ मिनिटांसाठी, झोपेतून उठल्यानंतर आणि झोपण्यापुर्वी, आपापल्या घरातून प्रकाश प्रवहन करणे. ह्या चळवळीचा मुख्य उद्देश, पृथ्वीवर शांतता नांदावी, हा आहे.

### चळवळीची खास वैशिष्ट्ये

- प्रकाशाने एकात्मता
- धर्मनिरपेक्ष, जागतिक
- कुठलेही नियम आणि अटी नाहीत
- कुठलेही सदस्यत्व नाही
- प्रत्येकजण शांततेसाठी योगदान देऊ शकतो
- वैयक्तिक आणि जागतिक मदत
- आपल्याला आणि जगाला नवीन युगात प्रवेश करण्यास मदत करते.

## संदेश

### गुरुजी कृष्णानंद

(गुरुजींच्या २३ सप्टेंबर २०१२ या दिवशीच्या भाषणातील काही वेचे)

अनुवादः मेधा कुलकर्णी

खऱ्या अर्थाने 'योग' म्हणजे काय?

'योग' म्हणजे प्रत्येक गोष्टीशी, प्रत्येक व्यक्तीशी पूर्णपणे सुसंवाद साधणे. त्याचप्रमाणे सबंध विश्वाशीही समरस होणे. 'योग' म्हणजे व्यापक अशा जागरुकतेमध्ये जगणे होय.

'योग' म्हणजे सर्व पातळ्यांवर सर्व सृष्टीशी, सर्व अस्तित्वाशी आणि शक्य असल्यास सर्व लोकांमधील जीवनाशी सुद्धा एकरूपता साधणे होय. या सबंध सृष्टीच्या, निर्मितीच्या हेतूशी जुळवून घेणे हाही 'योग' आहे.

'योग' म्हणजे सर्वोच्च शरणागतता. एक खरा योगी या जगाचे सर्व नियम, कायदे पाळतो; एवढेच नव्हे, तर योगीलोकांना लागू असणारे अधिक वरच्या पातळीवरील नियमही तो पाळतो. एखाद्या उदात्त हेतूसाठी तो काही नियम मोडू शकतो; परंतु तो तसे करत नाही. योगी हा गुरु असतो.

'योग' म्हणजे एखाद्या व्यक्तीचे, व्यक्तिगत यश किंवा व्यक्तिगत कामगिरी नव्हे. 'योग' नेहमीच इतरांशी आणि बाहेरच्या आयुष्याशीही जोडलेला असतो.

## संस्मरणीय घटना

जयंत देशपांडे, अनुवादः वैशाली जोशी

आपण खरोखर नवीन युगाच्या दिशेने वाटचाल करत आहोत का? कधीकधी आपल्याला ह्याबद्दल प्रश्न पडू शकतो, पण नवयुगाच्या दिशेने होणारी आपली वाटचाल ही एक वास्तविकता आहे. का कुणास ठाउक, नकारात्मक घटना जास्त अधोरेखित केल्या जातात आणि अनेक अद्भुत घडामोडींकडे दुर्लक्ष केले जाते. उदाहरणार्थ, आपण पाहू शकतो की चेतनेची पातळी उंचावली आहे. पण ते पुरेसे नाही.

आपली गति वाढवण्यासाठी आपण प्रकाशाशी एकतानता साधून जगले पाहिजे. जगण्याच्या प्रक्रियेत आपल्याला अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते. आपले सर्व व्यवहार सत्य आणि प्रामाणिकपणावर आधारित असावेत. आपण सहजच संघर्षाऐवजी शांतीची आणि द्वेषाऐवजी प्रेमाची निवड करू शकतो. जेव्हा आपण असे करतो, तेव्हा आपण मानवतेची नवयुगाकडे जाण्याची गति वाढवतो.

## प्रकाश प्रवहनाचे कार्य

मनोज चोप्रा, अनुवादः मेधा कुलकर्णी

आपण रहात असलेला काळ अनेक आव्हानांनी भरलेला आहे आणि आपल्या आयुष्यात आपल्याला अभूतपूर्व घटनांना सामोरे जावे लागते आहे. आपली प्रगती झालेली आहे, आपण उत्तम कामगिरी केलेली आहे, सर्व सुखसोयी, आराम आहे; तरीसुद्धा एक प्रकारच्या अनिश्चिततेची जाणीव आहे. दिवसेंदिवस ताणतणाव, चिंता वाढत आहेत–कामाच्या ठिकाणी आणि नातेसंबंधातसुद्धा. ज्यांना ही परिस्थिती हाताळणे अशक्य होते आहे, असे अनेक लोक आध्यात्मिकतेकडे वळत आहेत.

सबंध जगभर ध्यान करण्याविषयी जागरुकता वाढत असल्याचे दिसते आणि ही बाब समाधानकारक आहे. संयुक्त राष्ट्रांनी २१ डिसेंबर हा दिवस 'ध्यान दिन' म्हणून घोषित केला आहे, ही खरोखर एक ऐतिहासिक घटना आहे. मला खात्रीने असे वाटते की नव्या युगाकडे घेऊन जाणारे हे एक मोठे पाऊल आहे. येत्या वर्षांमध्ये या नवीन मोहिमेला अधिक बळ मिळत राहील; असा मला विश्वास आहे.

आम्ही, मानसा फाउंडेशनचे स्वयंसेवक २००८ सालापासून मुलांना व प्रौढांना प्रकाश प्रवहन शिकवत आहोत. हे एक प्रगत तंत्र असून अध्यात्म आणि ध्यानाच्या वाढत्या लोकप्रियतेत महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

**मानसा फाउंडेशन (र)**

तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर– बागलूर रोड), बंगलोर अर्बन ५६००७७, भारत

फोनः ९९०००७५२८० (सकाळी १० ते संध्याकाळी ५ पर्यंत)

इ–मेलः info@lightagemasters.com वेबसाइटः www.lightagemasters.com, www.lightchannels.com

## ऋषींची अनमोल वचनं

अनुवादः भुवन दिवेकर

- लोक जेव्हा अहंकाराच्या पातळीवर एकमेकांशी संवाद साधतात, तेव्हा ते लहान मुलांप्रमाणे दिसू लागतात, कधी रागावलेले तर कधी हट्टी. पण ते नेहमीच गमतीशीर असतात. तुम्ही तुमच्या मुलांबरोबर काय कराल? त्यांच्यावर प्रेम करून, त्यांच्या मोठे होण्याची वाट बघा!
- आपल्याला लक्षात ठेवले पाहिजे की आपण अपूर्ण आहोत आणि पूर्णत्वाकडे पोहोचण्याची आपली इच्छा आहे म्हणून आपण साधना सुरू करतो. पूर्णत्व प्राप्त झालेल्याला कुठल्याही अभ्यासाची गरज नसते.
- प्रत्येक वर्ष नवीन ऊर्जा घेऊन येतं. नवीन ऊर्जा नवीन जाणीवा घेऊन येतात. नवीन जाणिवांमुळे आपल्या कक्षा रुंदावतात आणि आपली प्रगती होते. हा पाडवा नवीन ऊर्जा आणि नवीन संधी घेऊन येत आहे. चला, ह्या संधींचा वापर करून आपली प्रगती करूया.
- स्वत:ची पूजा करून घेणं सोपं आहे, पण साधक पूजेच्या पातळीवर अडकून राहणार नाहीत हे पाहणे व त्यांना प्रकाशाशी एकरूप होण्याचा मार्ग दाखवणे, हे सद्गुरुंचं काम आहे.
- आपण मनुष्य पातळीवर राहतो. मनुष्य म्हणून राहणे हे नैसर्गिक आणि आध्यात्मिक आहे. आपल्याला ह्या गोष्टीचं अजून आकलन झालेलं नाही. अध्यात्म हे भाव-भावना, हास्य विनोद रहित आहे अशी आपली समजूत घालून दिलेली आहे, जी अत्यंत चुकीची आहे.
- प्रलय हा त्याच्या स्वत:च्या सुक्ष्म पद्धतीने काम करतो आहे. आपल्या आयुष्यात घट्ट रुतून बसलेल्या जुनकट श्रद्धा आणि मार्गांमधून आपल्याला खडबडून जागं करणं हे प्रलयाचं मुख्य काम आहे. प्रलय समजून घेणं सोपं नाही, पण प्रलयाचं कार्य बघणं हे नक्कीच चित्तवेधक आहे.
- जेव्हा आपण गुरुंशी जोडलेले असतो, तेव्हा वेळ आणि अंतर नाहीसं होतं. खरी नाती अनंतकाळ टिकतात, खोटी गळून पडतात.
- उपासना करणे ही प्रेम आणि आदर दर्शवणारी कृती आहे. मिळालेल्या शिकवणींचे उदात्तपूर्ण आणि सरळ मार्गांनी अनुसरण करणे हा, ती व्यक्त करण्याचा उत्तम मार्ग आहे. उपासना म्हणजे एकदा पूजा करणे नव्हे; ती म्हणजे आदर्श डोळ्यासमोर ठेवून सतत त्यानुसार वागण्याचा प्रयत्न करणे होय.
- प्रकाश युग यायच्या आधी भ्रष्टाचार आणि हिंसेचा चिखल साफ व्हायला हवा. त्यासाठी आपल्याला ध्यान आणि प्रकाश प्रवहन करायला हवे.
- संस्कृती आणि अध्यात्म ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सहनशीलता, शांततापूर्ण असहमती आणि निषेध, इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर करणे ह्या विकसित झालेल्या लोकशाहीच्या खुणा आहेत. ह्या आध्यात्मिक आहेत.
- नवीन युगाचं आध्यात्म सगळ्या सीमा नष्ट करून एकात्मता आणते.

– गुरुजी कृष्णानंद



राममूर्ती नगर, बंगलोर येथील एका शाळेच्या प्राचार्यांनी, फेब्रु. २१, २०२५ रोजी पालक-शिक्षकांच्या भेटीत प्रकाश प्रवहनाचे सत्र घेतले.



कालीकट, केरळ येथील एका शाळेतील विद्यार्थ्यांनी मार्च १, २०२५ रोजी प्रकाश प्रवहन सत्रामध्ये सहभाग नोंदवला.



फेब्रु.१, २०२५ रोजी बंगलोर येथील एका शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रकाश प्रवहन केले.

# यश आणि अपयश

मनोज चोप्रा, अनुवाद : भुवन दिवेकर

आयुष्य ही एक लढाई आहे आणि प्रत्येकजण जिंकायचा प्रयत्न करतो. लहानपणापासून आपल्यावर असे संस्कार केले जातात की, आयुष्य ही एक चढाओढ आहे आणि प्रत्येक पायरी जिंकली तरच टिकून राहता येणं शक्य आहे. आपल्या समाजात यशस्वी माणसाकडे आदर आणि कौतुकाने बघितलं जातं तर अयशस्वी माणसाकडे तुच्छतेने बघितलं जातं.

मला वाटतं, आपल्यापैकी प्रत्येक जण वेगळा आणि खास आहे आणि कोणालाच, फक्त यश आणि अपयशाच्या तराजूत तोलले जाऊ नये. यश आणि अपयश ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एका प्रसिद्ध वैज्ञानिकाने अगदी छान शब्दात सांगितलं आहे की, "अपयश हे प्रगतीपथावर असलेलं यश आहे."

यश आणि अपयश समजून घेण्यासाठी आपल्याला आयुष्याची काही सत्यं समजून घ्यावी लागतील. आपण ह्या अद्भुत जगात जन्म घेतला आहे तो अनुभव घेण्यासाठी आणि आयुष्य साजरं करण्यासाठी. आपण ज्या सुंदर जागी, अनंत संधींची चाचपणी करण्यासाठी आलो आहोत, ती काही विशिष्ट कायद्यांनी बांधली गेली आहे. दिवस आणि रात्रीप्रमाणेच यश आणि अपयश हे ह्या पृथ्वीवरचे नैसर्गिक पैलू आहेत. दुःखाच्या गर्तेत ढकलण्यासाठी म्हणून देव आपल्याला अपयश देत नाही तर, प्रत्येक अपयश हे अजून जास्त चमकण्यासाठी आणि प्रगती होण्यासाठी दिलेली संधी आहे. जेव्हा आपण संघर्ष करतो, तेव्हा आपली प्रगती होते आणि आपण अजून उच्च गोष्टी साध्य करतो.

साध्या भाषेत, यश म्हणजे आपण एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. त्याच वेळी, अपयश म्हणजे आपण अजून तिथपर्यंत पोहोचलो नाही. इतकंच. तो काही आपल्या मुल्य आणि क्षमतांवर कायमचा दिलेला निकाल नाही. हे सुद्धा समजून घेणं महत्त्वाचं आहे की यश आणि अपयश हे सापेक्ष आहेत. एखाद्या माणसासाठी असलेलं यश हे दुसऱ्यासाठी अपयश असू शकतं आणि दुसऱ्यासाठी असलेलं अपयश हे अजून कोणासाठी यश असू शकतं.

कधीकधी यशापेक्षा अपयश आपल्याला जास्त शिकवण देऊन जातं. ते आपल्याला नम्र करतं आणि आपल्यातल्या कमतरता दाखवून देतं. समस्यांकडे उच्च दृष्टीकोनातून बघण्यासाठीसुद्धा अपयशाची मदत होते. उच्च ध्येयं गाठण्यासाठी जेव्हा आपण स्वप्नं बघतो, तेव्हा आपल्या पदरी जास्त वेळा अपयश येतं. पण आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे की प्रत्येक कोसळणं हे आपल्याला किती उंच उडायचं आहे ह्याची जाणीव करून देणारं असतं.

यशामुळे आपल्याला समाधान मिळतं आणि आपण अजून मोठी स्वप्नं बघू शकतो हा आत्मविश्वास येतो. प्रकाश प्रवहनासारख्या साधना अप्रत्यक्ष अडथळे दूर करून आपलं ध्येय गाठण्यासाठी मार्ग दाखवतात. अपयशाला सामोरे जाण्याची ताकद देऊन, आपल्यातील ऊर्जांना नवचैतन्य देऊन, नव्या उमेदीने आपण पुढे जाऊ शकतो. एक संतुलित आयुष्य जगण्यासाठी लागणारी बुद्धी आपल्याला ह्यातून मिळते, हीच ह्यातली सोनेरी किनार आहे. प्रकाश प्रवहन फक्त मानसिक आरोग्यालाच खतपाणी घालत नाही तर शरीराचं आरोग्यसुद्धा देतं, आणि एकसंध, समग्र वाढीला व सुसंवादाला पाठींबा देतं.

मला वाटतं की आपण यश अपयशाच्या पलीकडे जायला शिकलं पाहिजे. दोन्हीपैकी कशाच्याही परिणामांमुळे वाहून जाता कामा नये कारण दोन्ही क्षणिक आणि सतत बदलणारे आहेत. माझ्या दृष्टीकोनातून खरं यश तेव्हा मिळतं, जेव्हा आपण आपल्यातल्या जीवन–शक्तीचं प्रकटीकरण करू शकू आणि आंतरिक आनंद अनुभवू शकू. ध्यान आणि प्रकाश प्रवहनासारख्या साधना आपल्याला अशा उच्च स्थितीकडे जाण्यासाठी सहाय्य करतात. त्या आपल्याला यश आणि अपयशाच्या दुहेरीपणाला ओलांडून, आपल्या स्वत्वाशी जोडून शांतता, हेतूपूर्ण आणि आनंदी आयुष्य जगायला मदत करतात. ■

### शाळांना आवाहन

जागतिक प्रकाश प्रवहन चळवळीला सशक्त करण्यासाठी, सकाळच्या प्रार्थनेच्या आधी किंवा पहिल्या तासाच्या आधी, ३ ते ७ मिनिटे प्रकाश प्रवहनाचा सराव करावा.

### शाळांमधील प्रकाश प्रवहन

| | |
|---|---|
| सहभागी शाळा | : ६१७५ |
| प्रकाश प्रवहन केलेले विद्यार्थी | : ३०.९८ लाख |
| नियमित प्रकाश प्रवहन करणाऱ्या शाळा | : : ५०८ |
| नियमित प्रकाश प्रवहन करणारे विद्यार्थी | : २.२१ लाख |

दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी सकाळी ११ ते ११.३० पर्यंत **प्रकाश प्रवहनाचे मार्गदर्शित ऑनलाईन सत्र** आयोजित करण्यात येईल, जे सर्वांसाठी खुले असेल. खाली दिलेल्या लिंकद्वारे ह्या सत्रात सहभागी होता येईल:


www.lightagemasters.com

नियमित प्रकाश प्रवहनाचा लाखो लोकांना फायदा झाला आहे. अनेकांना कल्पनातीत मदत मिळाली आहे आणि सुंदर अनुभव आले आहेत. तुमचा अनुभव दुसऱ्यांना प्रेरणा देऊ शकतो आणि मार्गदर्शक ठरू शकतो. कृपया आपला अनुभव आम्हाला कळवा.

info@lightagemasters.com

अनेक मुलं, शिक्षक आणि स्वयंसेवकांचे अनुभव "Experiences of Light Channels" ह्या पुस्तकात संकलित केले आहेत. पहिला खंड प्रकाशित झाल्यावर अनेकांनी त्यांचे अनुभव आम्हांला सांगितले, म्हणून दुसरा खंड प्रकाशित केला. तुम्हाला हे दोन्ही खंड आमच्या संकेतस्थळावरून निःशुल्क डाऊनलोड करता येतील.

www.lightchannels.com



## १५व्या जागतिक प्रकाशप्रवहन दिनाचे अनुभव

(संकलन: वैशाली जोशी, अनुवाद: प्रतिभा ओक, पद्मजा बाजपेयी)

मुस्कान एनजीओच्या विश्वस्तांनी सांगितलं की, एका विद्यार्थिनीच्या गालावरून अश्रुधारा ओघळत होत्या म्हणून प्रकाश प्रवहन सत्रानंतर मी तिच्याशी बोलले. तिने सांगितले की ती दहावीत शिकत आहे आणि प्रकाश प्रवहनाचा सराव करताना तिला खूप हलके वाटले. तिला असे वाटले की तिच्या मनावर जे ओझं होतं ते पूर्णपणे हलकं झालं आहे. तिला अतिशय शांतता आणि समाधानाचा अनुभव आला. त्यानंतर तिला जाणवले की हा अनुभव जीवनातील सर्वात मोठा आनंद होता. मग, ती हसली. ती या एनजीओमध्ये शिकणाऱ्या वंचित मुलांपैकी एक आहे.

तिच्या ह्या अनुभवाने मी खूप भारावून गेले आणि माझेही डोळे भरून आले, मला खूप आनंद झाला! मला वाटतं की हा आनंद लाखो मुलांची सेवा केल्यानंतर मिळणाऱ्या आनंदी भावनेइतकाच आहे.

– अलका सिंग, प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

मी जागतिक प्रकाश प्रवहन दिनी दोन प्रवहन सत्रे घेतली. पहिले वाग्देवी विलास शाळा, टी सी पाल्या येथे होतं. मी जेव्हा मुलांबरोबर प्रकाश प्रवहनाचा सराव करत होतो तेव्हा मला फक्त याच मुलांकडून नाही तर इतर शाळांमधून बऱ्याच मुलांकडून प्रकाशाचे प्रवहन होत आहे असे जाणवले. सर्वत्र विपुल प्रमाणात प्रकाश होता आणि मला ह्या प्रकाशाबरोबर एकात्मतेचा अनुभव आला. हा एक विशेष आणि संस्मरणीय अनुभव होता. या सत्रानंतर एका शिक्षिकेनी मला सांगितले की ती नियमित प्रकाश प्रवहनाचा सराव करते आणि तिला प्रवहनानंतर खूप शांतता जाणवते.

माझे दुसरे सत्र व्हाईटफिल्डमधील बीआयए‌ए येथे पहिली ते चौथीच्या मुलांसाठी होते. मुलांनी शांत बसण्यासाठी वेळ घेतला. मुले सभोवताली धावत होती आणि त्यांच्यामागे शिक्षिका धावत होत्या. मी विचार करत होतो की ही मुले प्रकाश प्रवहन समजून घेण्यासाठी खूप लहान आहेत का? पण जेव्हा सत्र सुरू झाले, प्रत्येकजण खूप शांत झाला. मला जे काही सांगायचे होते, ते सर्व काही लक्षपूर्वक ऐकत होते आणि आश्चर्यकारक गोष्ट अशी होती की त्यांनी नंतर विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिली. सर्वांनी दिलेल्या सूचनांचे योग्य रितीने पालन केले आणि अतिशय प्रामाणिकपणे सराव केला. ज्या शिक्षकांना सुरवातीला मुलांना शांत होण्यासाठी वारंवार सूचना द्याव्या लागत होत्या, त्यांना सत्रादरम्यान काहीही सांगावे लागले नाही. मी अशा अद्भुत संधीबद्दल मानसा कुटुंब व ऋषींचे आभार मानतो.

– वरूणसाई मंचीकांती,
प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

शुक्रवारी सकाळी केंद्रीय विद्यालय, मल्लेश्वरम येथे ज्या क्षणी मी प्रकाश प्रवहन सत्राला सुरुवात केली, मला जाणवले की या सत्राचा ताबा प्रकाशाने घेतला आहे कारण माझ्याकडून शब्द आपोआप बोलले जात होते आणि माझा उत्साह वाढवत होते. सत्रानंतर एका मुलाने त्याचा अनुभव सांगितला. तो म्हणाला, “फक्त हे जगच नव्हे तर इतर ग्रह, आकाशगंगा या सुद्धा प्रेम आणि शांतीने भरून गेल्या होत्या.”

माझ्या पुढच्या, स्टेला मेरी या शाळेतील प्रकाश प्रवहन सत्रामध्ये मला जाणवलं की विद्यार्थी प्रकाशाचं प्रवहन करताना प्रकाशामध्ये तल्लीन झाले आहेत. तेथील शांतता आणि दिव्यतेचे अस्तित्व मला जाणवले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर शांततेची भावना प्रतिबिंबित झाली होती.

संपूर्ण दिवस शांतता आणि प्रेमाने भरून गेला होता. मी ऋषी, गुरुजी आणि प्रकाशाचे या सुंदर अनुभवांसाठी आभार मानते.

– सुजाता रामाराव,
प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

या वर्षीचा जागतिक प्रकाश प्रवहन दिन अद्भुत होता! या कार्यक्रमानंतरसुद्धा काही दिवस या प्रकाशाचा परिणाम जाणवत होता. मला खूप शांत वाटत होते आणि पुढील काही दिवस माझे मन शुद्ध व अविचलित होते. मी जीवनप्रक्रियेवर जास्त विश्वास ठेवायला व समर्पण करायला शिकत आहे. प्रकाश प्रवहन खरेच यासाठी मदत करते!

– श्रिया शशांक, एक प्रकाश प्रवाहक

प्रकाश प्रवहन हे मराठी द्वै-मासिक असून, त्याचे वितरण हे खाजगी आहे. मानसा फाउंडेशन (र) तर्फे प्रकाशन, मुद्रण आणि संपादकीय काम हे जयंत देशपांडे बघतात. प्रकाशन मानसा फाउंडेशन (र), तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर- बागलूर रोड), बंगलोर – ५६००७७, येथून आणि मुद्रण मे. जोस्को प्रिंटर्स, राममूर्तिनगर, बेंगळूरु ५६००१६. मालकी हक्क: मानसा फाउंडेशन (र), तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर- बागलूर रोड), बेंगळूरु ५६००७७ संपादक: जयंत देशपांडे